IIP
IIPIMRJ
International Multidisciplinary Research Journal
An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 02 No. Issue IV, (October-December) (2025)
Impact Factor: GSRD-IF: 5.001
ISSN: 3049-2734 (Online)

# आंतरराष्ट्रीय कबड्डी स्पर्धेमध्ये महिला कबड्डी खेळाडूंचा प्रवास

**प्रा.डॉ. विद्या चिल्लाप्पा पाटील**
शारीरिक शिक्षण संचालक
सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज,कराड

**Article Info**

***Article History:***
Received: 15th Dec 2025
Accepted: 19th Dec 2025
Published: 20th Dec 2025

***Keywords:***
*शारीरिक सुदृढता, क्रीडा विज्ञान, ताकद आणि सहनशक्ती*

**ABSTRACT**

कबड्डी हा खेळ आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत पोहोचण्याचा प्रवास कशा पद्धतीने झाला याचा अभ्यास यामध्ये केलेला आहे.भारतामध्ये अगदी प्राचीन काळापासून खेळला जाणारा कबड्डी हा खेळ आंतरराष्ट्रीय पातळीवर लोकप्रिय झालेला आहे. A.K.F.I.,S.A.K.F व I.K.F या तीन संघटनांनी “Today is Asian game, Tomorrow is Olympic” हे ध्येय ठेवून या खेळाचा प्रचार व प्रसार करीत आहेत. आज जवळ जवळ ३१ पेक्षा जास्त देशांमध्ये हा खेळ खेळला जातो व त्यांचे संघ आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये सहभागी होतात. पुरुष व महिला अशा दोन्ही गटातील स्पर्धांचा समावेश अशियाई स्पर्धा, दक्षिण आशियाई स्पर्धा, वर्ल्ड कप कबड्डी स्पर्धा तसेच एशियन चॅम्पियनशिप स्पर्धेमध्ये या खेळांचा समावेश केला आहे. प्रो-कबड्डी मुळे तर या खेळाला एक ग्लॅमर स्वरूप प्राप्त झाले असून लवकरच हा खेळ ऑलिंपिक स्पर्धेमध्ये सहभागी होण्याच्या दिशेने वाटचाल करीत आहे.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: Dec 18, 2025
Similarity Index: 4%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2025 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Patil, V. C. (2025). ***आंतरराष्ट्रीय कबड्डी स्पर्धेमध्ये महिला कबड्डी खेळाडूंचा प्रवास.*** *IIP: International Multidisciplinary Research Journal (IIPIMRJ)*, **2**(IV), **pp. 1368–1374**.



**१. प्रास्ताविक :-**

कबड्डी हा खेळ अगदी पुरातन काळापासून आपल्या देशात खेळला जातो. महाभारत युद्धकालीन, कौरवांनी रचलेल्या चक्रव्युहात अभिमन्यूने जसा प्रवेश केला होता व अनेकांना त्याने एकट्याने लढत दिली. त्याचपद्धतीने या खेळात एकबाजूस सात क्षेत्ररक्षक असतात व प्रतिस्पर्धींचा एक खेळाडू दम घेऊन चढाई करतो व त्यांच्याशी लढत देतो. अनेकांना एकत्र घेऊन खेळल्या जाणाऱ्या या खेळात जोश आहे,झटापट आहे, ताकद दाखवण्यास वाव आहे आणि ताकदवान खेळाडूला क्रीडा नैपुण्याच्या जोरावर नामोहरण करण्याची संधी आहे.

**२.कबड्डी खेळाचे ऐतिहासिक पार्श्वभूमी :-**

हा खेळ भारतात वेगवेगळ्या प्रांतात वेगवेगळ्या नावाने प्रचलित होता.महाराष्ट्रात या खेळाला किंवा खेळात दम घालण्यासाठी हुतुतू हा शब्द वापरला जात होता.कळेवाडी कच्छ भागांमध्ये भाडे-भाडे असे म्हणत. दक्षिणेत डूगुडू, केरळ मध्ये वडी-वडी, बंगालमध्ये डू-डू-डू-डू, उत्तर भारतामध्ये कोमवरा,साबरगन्ना व मध्यप्रदेशमध्ये कबड्डी हे शब्द खेळताना उच्चारले जात. तसेच हा खेळ १)गनिमी २)अमर ३)संजीवनी अशा पद्धतीने खेळला जात होता. कबड्डी खेळाला आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचविण्यामध्ये व त्यांचा प्रचार व प्रसार करण्यामध्ये महाराष्ट्राने खूप मोठा हातभार लावला आहे. श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती या संस्थेने भारतीय व्यायाम व कबड्डी खेळाचा विकास केला. सन १९३६ मध्ये बर्लिन(जर्मनी) येथे ११वी ऑलिंपिक स्पर्धा झाली.ऑलिंपिक संघटनेच्या नियंत्रणानुसार या मंडळाच्यावतीने २७ जणांचे एक शिष्टमंडळ बर्लिन ला गेले होते त्यांनी त्या स्पर्धेमध्ये हुतूतू, खो-खो,आट्यापाट्या या खेळांचे प्रात्यक्षिक दाखवले.

**३.कबड्डीचा आंतरराष्ट्रीय प्रवास :-**

सन १९२८ साली भारतीय ऑलिम्पिक संघटना अस्तित्वात आली.या संघटनेने १९३८ साली कबड्डी या खेळाला मान्यता दिली. त्यामुळे त्याला भारतीय स्वरूप आले आणि देशाबाहेर जाण्याचे मार्ग मोकळे झाले.

सन १९५७ मध्ये बाबाली जमसडेकर यांच्या नेतृत्वाखाली भारतीय कबड्डी संघ मास्को (रशिया) येथे होणाऱ्या जागतिक युवक उत्सवांमध्ये कबड्डी या खेळाचे प्रात्यक्षिके दाखविण्यासाठी जाणार होता पण त्या वेळचे केंद्रीय अर्थमंत्री मोरारजी देसाई यांनी तांत्रिक मुद्यावरून हा रशिया दौरा रद्द केला.पण भारतीय कबड्डीचे प्रतिनिधी म्हणून श्री दत्ता मालप यांना रशियाला जाण्याची संधी मिळाली.

सन १९७१ साली कबड्डी खेळाचे प्रशिक्षण शिबिर नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ स्पोर्ट्स पतीयाळा येथे सुरू करण्यात आले. शेजारचे देश नेपाळ,बांगलादेश,श्रीलंका या देशातील प्रशिक्षकांना पदविका अभ्यासक्रमासाठी विविध विषयातील प्रशिक्षणासाठी तसेच कबड्डी खेळाच्या माहितीसाठी नियमितता येथे पाठवून लागले.

बांगलादेशाच्या निर्मितीनंतर सन १९७४ साली भारतीय संघ श्री शेखर शेट्टी (महाराष्ट्र) यांच्या नेतृत्वाखाली बांगलादेशाचे त्यावेळचे अध्यक्ष मुलीनूर रहेमान यांचे आमदानीत या संघाने ढाका,जेसोर, परिदपुर, कामील्ला व दिनापूर येथे पाच

कसोटी सामने खेळली गेले. या समूहाचे नेतृत्व श्री शंकर साळवी (बुवा साळवी) यांनी केले.सन १९७५ मध्ये मा.श्री शरदचंद्र पवार यांच्या रूपाने कबड्डी ला तरुण नेतृत्व लाभले. त्यांनी कबड्डीला भारताबरोबरच आशिया खंडात व जगातील इतर देशात प्रचार व प्रसार करण्यासाठी फार प्रयत्न केले. सन १९७८ साले मा. श्री शरदचंद्र पवार साहेब यांच्या प्रयत्नामुळे व बँक ऑफ महाराष्ट्रच्या सहकार्याने पुरुष व महिला संघ नेपाळ,भूतान या देशांचा सदिच्छा दौरा केला. सदर दौऱ्याच्या वेळी येणाऱ्या संपूर्ण खर्चाची जबाबदारी बँक ऑफ महाराष्ट्राने घेतली होती. सदर सदिच्छा दौरा कबड्डी खेळाच्या प्रचारासाठी फार उपयुक्त ठरला.त्यामुळेच मध्य प्रदेशातील भिलाई येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेला रौप्य महोत्सव वर्षावेळी द एशियन ॲम्युच्युयल कबड्डी फेडरेशनची स्थापना करण्यात आली. मा. श्री शरदचंद्र पवार हे या संघटनेचे अध्यक्ष बनले.

सन १९७९ मध्ये बांगलादेश कबड्डी संघ भारतामध्ये पाच कसोटी सामने खेळण्यासाठी आला होता. या संघाने मुंबई, हैदराबाद, भिलाई, दिल्ली व कोल्हापूर येथे सामने खेळले तर सोलापूर, बडोदा व इतर तीन ठिकाणी विभागीय सामने खेळले.

सन १९९४ साली महाराष्ट्रातील एअर इंडिया,महिंद्रा अँड महिंद्रा, आई.सी.एफ व बँक स्पोर्ट्स या चार संघानी युरोपचा दौरा करून तेथे काही प्रदर्शनीय सामने खेळले. कबड्डी खेळाची माहिती तेथील शाळा/ महाविद्यालयातील मुलामुलींना देऊन खेळाचा प्रसार केला.

**४. दक्षिण आशियाई व आशियाई स्पर्धेमध्ये कबड्डीचा समावेश :-**

सन १९५७ सालामध्ये झालेल्या पहिल्या आशियाई स्पर्धेमधून कबड्डी चा आशियाई स्पर्धेमध्ये अधिकृतरित्या समावेश व्हावा म्हणून बरेच प्रयत्न केले गेले. पण पहिल्या आशियाई कबड्डी स्पर्धेचे आयोजन सन १९८० साली कलकत्ता येथे करण्यात आले. यामध्ये भारत,नेपाळ व बांगलादेश या तीन राष्ट्रांनी भाग घेतला. त्यानंतर सन १९८१ मध्ये बांगलादेश या तीन राष्ट्रांनी भाग घेतला. त्यानंतर सन १९८१ मध्ये बांगलादेश (ढाका) मध्ये दुसरी आशियाई स्पर्धा झाली. याचवर्षी मा.श्री शरदचंद्र पवार यांच्या प्रयत्नाने होगॅनो (जपान) च्या महापौरांच्या सहकार्याने जपान दौरा आखण्यात आला. या दौऱ्याचे भारताचे पुरुष व महिला प्रत्येकी दोन संघ सहभागी झाले. या संघानी बँकॉक (थायलंड),मनिलार (फिलिपरीस), पिगाव (मलेशिया) व होगॅनो (जपान) येथे सामने खेळले.

सन १९८२ मध्ये भारतात दिल्ली येथे झालेल्या ९व्या आशियाई स्पर्धेच्या वेळी कबड्डी या खेळाचे प्रात्यक्षिके दाखविण्यासाठी परवानगी मिळाली. सनी १९८४ पासून दक्षिण आशियाई फेडरेशन (सॅफ) मध्ये कबड्डीचा समावेश एक नियमित खेळ म्हणून करण्यात आला. ढाका (बांगलादेश) येथे झालेल्या सॅफ गेम्समध्ये कबड्डी खेळाच्या प्रथमच स्पर्धा झाल्या. दर दोन वर्षांनी होणाऱ्या सॅफ स्पर्धेमध्ये तेव्हापासून कबड्डी चा समावेश नियमितपणे करण्यात आला आहे. दुसऱ्या आशियाई चॅम्पियनशीप कबड्डी स्पर्धा भारतामध्ये जयपूर येथे भरविण्यात आल्या. या स्पर्धेत प्रथमच राजस्थान,जपान व मलेशिया यांनी भाग घेतला.

सन १९९० साली बीजिंग (चीन) येथे झालेल्या ११व्या आशियाई खेळामध्ये कबड्डी चा समावेश एक नियमित खेळ म्हणून करण्यात आला. भारतीय संघाने या स्पर्धेमध्ये सुवर्णपदक मिळवले. ही गोष्ट कबड्डी या खेळाच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाची आहे.त्यानंतर सन १९९४ साली हिरोशिमा (जपान) येथे व १९९८ साली थायलंड मधील बँकॉक मध्ये झालेल्या दोन्ही आशियाई स्पर्धेमध्ये भारताने सुवर्णपदक मिळवले. सन १९९५ मध्ये जपान या देशांमध्ये नाइके (NIKE) या कंपनीमार्फत आंतरराष्ट्रीय महिला कबड्डी स्पर्धा **"गोल्डकप"** या नावाने भरविण्यात आली. सन २००४ मध्ये श्रीलंका येथे तिसऱ्या आशियाई चॅम्पियनशिप स्पर्धा भरवण्यात आल्या. त्या स्पर्धांमध्ये श्रीलंका संघाने प्रथमच श्रीलंका देशास रौप्य पदक मिळवून दिले. त्यांनी पाकिस्तान संघाचा पराभव केला.

सन २००२ सालामध्ये भारतातील हैद्राबाद येथे झालेल्या स्पर्धेत आफो देशांना या खेळांची ओळख करून देण्यात आली. सन २००६ मध्ये दोहा (कतार) येथे झालेल्या १५व्या आशियाई स्पर्धेमध्ये प्रथमच आशियाई स्पर्धेच्या इतिहासात कबड्डी खेळासाठी स्वतंत्र इन डोअर मैदान उभारण्यात आले. मैदानाचा वापर कबड्डी प्रशिक्षण व स्पर्धेसाठी होणार आहे. या खेळाच्या मैदानावर कोरिया मध्ये विशिष्ट प्रकारचे खास कबड्डीसाठी तयार करण्यात आलेले मॅट वापरण्यात आले. यांना पझले मॅट असे म्हणतात. तसेच क्रिकेट प्रमाणेच मोठी टी.व्ही स्क्रीन उभारण्यात आली. त्यावरून चालू सामन्याचे थेट प्रक्षेपण- रिप्ले दाखविला जाई. तसेच सदर स्पर्धेमध्ये भारताने सुवर्णपदक प्राप्त केले.

दोहा (कतार) येथे झालेल्या पंधराव्या आशियाई स्पर्धेमुळे कबड्डी खेळाच्या प्रदर्शनाची भरपूर संधी पुरविली. या खेळाच्या आयोजनांमध्ये सहभागी झालेल्या युरोपमधील व ऑस्ट्रेलियातील लोकांना या खेळाची भरपूर माहिती मिळाली. या

स्पर्धांसाठी मोठ्या प्रमाणात प्रेक्षक हे युरोप,अमेरिका,पश्चिम आशिया, भूमध्य समुद्र देशातील होते. त्यांना हा खेळ पाण्याची संधी मिळाली.

आशियाई स्पर्धेबरोबरच इनडोअर आशियाई स्पर्धेमध्ये देखील या खेळाचा समावेश २५ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर २००७ मध्ये अखेर मकाऊ येथे झालेल्या दुसऱ्या आशियाई इनडोअर स्पर्धेमध्ये कबड्डी खेळाचा समावेश करण्यात आला.

**५. वर्ल्डकप कबड्डी स्पर्धा** :-

सन २००४ साली श्री जया शेट्टी यांनी पुढाकार घेऊन मुंबईतील भारतीय क्रीडा मंदिर येथे निमंत्रित देशाची पहिली वर्ल्ड कप कबड्डी स्पर्धा भरविण्यात आली.सदर स्पर्धेमध्ये भारत,बांगलादेश,जपान, नेपाळ,पाकिस्तान,भूतान,श्रीलंका या आशियाईदेशांबरोबरच इंग्लंड,दक्षिण कोरिया,वेस्टइंडीज,इराण,मलेशिया बँकॉक (थायलंड) या देशांनी सहभाग घेतला व तेथे आंतरराष्ट्रीय महासंघाची स्थापना (IKF) करण्यात आली. श्री जनार्दन गेहलोत हे या संघटनेचे अध्यक्ष झाले.अत्यंत चुरशीच्या खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यांमध्ये भारताने इराणचा पराभव करून विजेतेपद संपादित केले.

सन २००७ साली पनवेल (रायगड) येथे दुसरी वर्ल्डकप स्पर्धा भरविण्यात आली. सदर स्पर्धेमध्ये पूर्वी दक्षिण कोरिया,जपान,वेस्टइंडीज,मलेशिया,इंग्लंड या संघानी महाराष्ट्रातील स्थानिक व व्यावसायिक संघाबरोबर बरेच प्रदर्शनीय सामने खेळले. सदर स्पर्धांमध्ये भारताने विजेतेपद प्राप्त केले. तरी इराण,जपान, वेस्टइंडीज, इंग्लंड या देशांच्या संघाने व खेळाडूंनी आपल्या खेळात अतिशय चांगली प्रगती केलेली दिसून आली.

**६.दक्षिण आशियाई व आशियाई स्पर्धेमध्ये महिला कबड्डी स्पर्धांचा समावेश** :-

पहिली आशियाई कबड्डी(महिला) स्पर्धा सन २००५ साली हैद्राबाद भारत येथे भरविण्यात आल्या. सदर स्पर्धेमध्ये भारताने सुवर्णपदक जिंकले. सन २००६ साली कोलंबो (श्रीलंका) येथे झालेल्या दक्षिण आशियाई स्पर्धेमध्ये प्रथमच महिला कबड्डी स्पर्धांचा समावेश करण्यात आला. सदर स्पर्धेमध्ये भारतीय महिला संघाने सुवर्णपदक प्राप्त केले. कबड्डी या खेळाच्या प्रचार व प्रसारासाठी A.K.F.I ने व शासनाने बरेच प्रयत्न केले आहेत. पुरुषांच्या बरोबरच महिलांचेही अनेक प्रदर्शनीय सामने आफ्रिका, युरोप, अमेरिका खंडातील राष्ट्रांमध्ये खेळले त्याचेच यश म्हणजे १६ व्या आशियाई स्पर्धेमध्ये महिला गटाच्या कबड्डी स्पर्धांचा समावेश केला गेला. ही स्पर्धा नोव्हेंबर २००६ सालामध्ये गानगझाऊ (चीन) येथे झाली. सदर स्पर्धेसाठी जपान,मलेशिया, थायलंड या देशाने आपल्या संघांची कामगिरी सुधारण्यासाठी व खेळाडूंचा सराव करून घेण्यासाठी भारतातील कबड्डी खेळाचे तज्ञ प्रशिक्षकांना आपल्या संघाच्या प्रशिक्षक पदी करारमध्ये केले.या स्पर्धेमध्ये भारत व इराण हा उपांत्य फेरीचा सामना अतिशय अटतटीत झाला. निर्धारित वेळेमध्ये दोन्ही संघाचे समान गुण झाले व गोल्डन रेड (सुवर्ण चढाई) मध्ये भारताने हा सामना जिंकला. इराण,थायलंड,जपान यासारख्या महिलांच्या संघांनी अतिशय चांगला खेळ करून भविष्यामध्ये भारतासमोर एक कडवे आव्हान उभे केले आहे. पहिल्या महिला आशियाई कबड्डी स्पर्धेमध्ये भारताने सुवर्णपदक प्राप्त केले तर थायलंड संघाने रौप्य पदक प्राप्त केले.

**७.पहिली महिला वर्ल्ड कप स्पर्धा:-**

सॅफ गेम्स व आशियाई स्पर्धांमध्ये महिलांच्या कबड्डी स्पर्धांचा समावेश केला होता. आंतरराष्ट्रीय पातळीवरील महिला संघाचा वाढता सहभाग पाहून आशियाई कबड्डी फेडरेशन व इंटरनॅशनल कबड्डी फेडरेशनच्या मान्यतेने बिहार सरकार व A.K.F.I ने १ ते ४ जानेवारी २०१२ मध्ये बिहार स्थापन दिवसानिमित्त पहिल्या महिला वर्ल्ड कप कबड्डी स्पर्धेचे आयोजन केले. ही स्पर्धा पाटणा (बिहार) येथे अतिशय दिमागदार पद्धतीने संपन्न झाली. सदर स्पर्धेमध्ये यु.एस.ए, मलेशिया,मेक्सिको,चीन,इटली,श्रीलंका,कॅनडा, नेपाळ,जपान,इराण,कोरिया,बांगलादेश,इंडोनेशिया,इंग्लंड,थायलंड या १६ देशांनी सहभाग घेतला. कबड्डी इतिहासामध्ये प्रथमच आशियाई खंडाशिवाय युरोप व अमेरिका या खंडातील देशातील महिलांच्या संघानी सहभाग घेतला.या पहिल्या महिला वर्ल्ड कप कबड्डी सामन्याचे थेट प्रक्षेपण हे दाखवण्यात आले.प्रचंड उत्साहाला व प्रेक्षकांच्या उदंड प्रतिसादाच्या जोरावर ही स्पर्धा यशस्वी झाली.सदर स्पर्धेमध्ये उपांत्य सामन्यांमध्ये भारताने जपान संघावर तर इराण संघाने थायलंड संघावर विजय मिळवून अंतिम सामन्यांमध्ये प्रवेश केला.अंतिम सामना हा भारत व इराण या दोन संघांमध्ये झाला. २५-१९ अशा अवघ्या ६ गुणांनी भारतीय संघाने पहिल्या महिला जागतिक कबड्डी स्पर्धेचे अजिंक्यपद पटकाविले.भारतीय संघाची कर्णधार ममता पुजारी हिला विश्वचषक देण्यात आला तर इतर खेळाडूंना मेडल देऊन गौरविण्यात आले. इराण संघाने सिल्वर मेडल तर जपान व थायलंड संघाने ब्रॉंझ पदक प्राप्त केले.

महाराष्ट्राच्या दृष्टीने गौरवाची गोष्ट म्हणजे भारतीय संघामध्ये पुण्याची दीपिका जोसेफ, मुंबई शहरची सुवर्णा बारटक्के तर उपनगरची अभिलाषा म्हात्रे या तीन खेळाडू होत्या तर सदर संघाचे प्रशिक्षक हे कोल्हापूरचे रमेश भेंडी गिरी हे होते.

महाराष्ट्र शासनाने या खेळाडूंची कामगिरी पाहून या तिन्ही खेळाडूंना महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री व महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष मा.श्री अजित पवार यांनी प्रत्येक खेळाडूला१कोटी रु. चे तर प्रशिक्षकांना २५ लाखाचे बक्षीस दिले.कबड्डी इतिहासातील ही सर्वात मोठी बक्षिसाची रक्कम होती.तसेच प्रत्येक खेळाडूला शासकीय सेवेमध्ये क्लास 'अ' ची नोकरी दिली.

**भारतीय महिला कबड्डी संघाची कामगिरी:-**

महिला कबड्डी विश्वाचषक स्पर्धेचा इतिहास पाहता भारताने यात वर्चस्व गाजविले आहे.२०१२ नंतर भारताने नुकत्याच २०२५ ढाका येथे झालेल्या स्पर्धेतही चायनीज तैपेईचा ३५-२८ ने पराभव करून दुसरे विजेतेपद पटकावले.ज्यामुळे भारत या स्पर्धेतील सर्वात यशस्वी संघ ठरला आहे. आंतरराष्ट्रीय कबड्डी महासंघाने आयोजित केलेल्या महिला विश्वचषक स्पर्धामध्ये (IKF World CUP)भारताने आतापर्यंतचे सर्व (०२) विजेतेपद पटकावले आहेत ज्यात इराण नेहमी उपविजेता राहिला आहे.

**भारतीय महिला संघाची कामगिरी (अंतरराष्ट्रीय):-**

१) **विश्वचषक :** २०१२,२०१३,२०१४,२०१६,२०२५मध्ये विजेतेपद
२) **आशियाई क्रीडा स्पर्धा :** २०१०,२०१४,२०२२ मध्ये सुवर्णपदक
३) **दक्षिण आशियाई क्रीडा स्पर्धा :** २००६,२०१०,२०१६,२०१९,मध्ये सुवर्णपदक




Kabaddi Women International Competition

**८.प्रो कबड्डी:-**

क्रिकेट आयपीएल च्या धर्तीवर सुरू झालेली व "जीता है वही जो हार न माने" हा सिद्धांत घेऊन पुढे वाटचाल करणाऱ्या प्रो कबड्डी लीगचा जन्म २६ जुलै २०१४ मध्ये झाला. प्रो कबड्डी लीग भारतातील एक व्यावसायिक कबड्डी लीग म्हणून जन्मास आली. २६ जुलै, २०१४ मध्ये सुरू झालेल्या या लीगमध्ये पहिल्या आवृत्तीत जगभरातील खेळाडूंचा सहभाग असलेले जयपूर पिंक पँथर्स,यु मुंबा,पटना पायरेट्स,बंगळूरू बुल्स, तेलगू टायटन्स,दबंग दिल्ली,बंगाल वारियर्स,पुणेरी फलटण हे आठ संघ सहभागी झाले होते.याची दुसरी आवृत्ती १८ जुलै २०१५ रोजी सुरू झाली.सध्या या स्पर्धेवर मशाल स्पोर्ट्सच्या व्यवस्थापकीय संचालक चारू शर्मा यांचे नियंत्रण आहे.तसेच याचे प्रक्षेपण करण्याचे अधिकार स्टार स्पोर्ट्स या टी.व्ही चॅनेल कडे आहेत.आतापर्यंत या लीगचे चार सीजन झाले असून पाचव्या सीजन करता एकूण बारा संघ सहभागी करून घेण्यात आली आहेत .

सदर लीगचे सामने होत असताना कबड्डीच्या पूर्वीच्या नियमांमध्ये काही बदल करण्यात आले आहेत.त्यामध्ये संरक्षण करणाऱ्या संघाचे क्रीडांगणामध्ये तीन,दोन,एक खेळाडू शिल्लक असतील व त्यांनी विविध संघाच्या चढाई करणाऱ्या खेळाडूची पकड केल्यास संरक्षण करणाऱ्या संघास दोन गुण दिले जातात. त्याला सुपर टॅकल असे म्हणतात.चढाई करणाऱ्या खेळाडूंनी विरुद्ध संघातील तीन किंवा तीन पेक्षा जास्त खेळाडू बाद केल्यास त्यास सुपर रेड असे म्हटले जाते.चढाई किंवा संरक्षण करणाऱ्या संघास पंचांनी दिलेला निर्णय अमान्य असल्यास पूर्ण सामन्यांमध्ये दोन वेळा तिसऱ्या पंचाकडे दाद मागता येते.चढाई करणाऱ्या खेळाडूची चढाई ३० सेकंद ही वेळ मोजण्यासाठी इलेक्ट्रिकल बजल यंत्र अमलात आणले. वरील प्रमाणे केलेल्या बदलामुळे कबड्डी खेळायला शिस्त आली.खेळाचा वेग विश्वसनीयता,लोकप्रियता,आकर्षकता यामध्ये लक्षणीय वाढ होऊन कबड्डी हा खेळ लोकप्रियतेच्या शिखरावर पोचला आहे.

याचाच फायदा देशात व परदेशातील सहभागी कबड्डी खेळणाऱ्या खेळाडूंना झाला असून त्याच्या लोकप्रियतेमध्ये,आर्थिक स्तरांमध्ये लक्षणे सुधारणा झाली आहे.यातूनच कबड्डीच्या प्रगतीला भारतातच नव्हे तर प्रदेशातही चालना मिळत आहे.कारण संघ खरेदी करणारे संघमालक आज भारतीय खेळाडूंबरोबरच परदेशी खेळाडूंनाही लाखात रक्कम देण्यास तयार आहेत हे परदेशी खेळाडूंच्या कबड्डी खेळातील प्रगतीचे उत्तम उदाहरण आहे

**९.आंतरराष्ट्रीय स्तरावर कबड्डी खेळाच्या संघटना :-**

१) S.A.K.F (South Asian Kabaddi Federation) (दक्षिण आशियाई कबड्डी संघटना)
२) A.K.F (Asian Kabaddi Federation) (आशियाई कबड्डी संघटना)
३) I.K.F (International Kabaddi Federation) (आंतरराष्ट्रीय कबड्डी संघटना)

या तीन संघटना स्थापन झालेले आहेत.या संघटनेमध्ये कबड्डी खेळ खेळणारे ३१ देश सदस्य आहेत.

**१०.आंतरराष्ट्रीय स्तरावर ती भरवले जाणारे सामने** :-

१) वर्ल्ड कप कबड्डी स्पर्धा
२) आशियाई कबड्डी स्पर्धा
३) दक्षिण आशियाई कबड्डी स्पर्धा
४) इन-डोअर आशियाई कबड्डी स्पर्धा
५) एशियन चॅम्पियनशिप कबड्डी स्पर्धा
६) आशियाई बीच गेम कबड्डी स्पर्धा
७) कुमार व कुमारी गट एशियन चॅम्पियनशिप कबड्डी स्पर्धा

**११.निष्कर्ष**:-

भारतातील ग्रामीण भागामध्ये खेळला जाणारा हा खेळ आज आंतरराष्ट्रीय पातळीवर लोकप्रिय होत आहे.प्रो कबड्डी मुळे तर या खेळाला आंतरराष्ट्रीय स्तरावर ग्लॅमर प्राप्त झाले आहे.आज जवळजवळ ३१ देशांमध्ये हा खेळ खेळला जातो. **"Today is Asian Game Tomorrow is Olympic"** हे ध्येय ठेवून आंतरराष्ट्रीय स्तरावर काम करणाऱ्या संघटना जास्तीत जास्त देशांमध्ये हा खेळ खेळला जावा या दृष्टीने या खेळाचा प्रसार व प्रचार करीत आहेत.त्यामुळे भविष्यात हा खेळ आशियाई स्पर्धेबरोबरच ऑलिंपिक स्पर्धेमध्ये देखील एक नियमित खेळ म्हणून मान्यता मिळवेल.

**संदर्भ सूची :-**

आगलावे,प्रदीप (२०००),संशोधन पद्धती शास्त्र व तंत्र,विद्या प्रकाशन,नागपूर.

भेंडीगिरी,आर.एन.(१९९६),आधुनिक व शास्त्रीय कबड्डी प्रशिक्षण,प्रथम आवृती,ताराराणी स्पोर्ट्स क्लब प्रकाशन ,कोल्हापूर.

E Prasad Rao(2002).The Complete Handbook On kabaddi.First Published,Jagdamba Publication, Vizianagram.

International Kabaddi Faderation (2016).Member Countries,Homepage,Retrieved July30,2016.from http://www.kabaddiikf.com/countries.htm.

International Kabaddi Faderation (2016).World Cup 2007,Homepage,Retrieved July30,2010.fromPro Kabaddi (2014) http://www.prokabaddi.com.